शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची माहिती

निवासी आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली

सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

कार्यालयाची आवश्यकता:

निवासी आयुक्त कार्यालयातील आस्थापना विषयक कामाकरिता आणि कार्यालयातंर्गत असलेल्या महाराष्ट्र सदन या शासकीय अतिथीगृहातील गृहसज्जा / उपहारगृह व्यवस्थापन/ अतिथीगृह व्यवस्थापन या कामाकरिता अनुभव असलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. उमेदवारानी दि. 03.02.2020 पर्यंत सोबत जोडण्यात आलेल्या विहित प्रपत्रात निवासी आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, मंडी हाऊसजवळ, नवी दिल्ली-110001 या पत्त्यावर अर्ज पाठवावेत. तसेच विहित प्रपत्रातील भरलेला अर्ज उमेदवार arcestmahasadan@gmail.com या ईमेलवर देखील पाठवू शकतील.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 | सहाय्यक कक्ष अधिकारी किंवा तत्सम पदावरुन किंवा वरीष्ठ पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी | 1. उमेदवार शासकीय / निमशासकीय सेवेतून या पदावरुन किंवा तत्सम पदावरुन किंवा वरीष्ठ पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.<br>2. उमेदवारास शासकीय अतिथीगृहातील गृहसज्जा/ उपहारगृह व्यवस्थापन/अतिथीगृह व्यवस्थापन कामाचा अनुभव असावा.<br>3. गृहसज्जा/उपहारगृह व्यवस्थापन/ अतिथीगृह व्यवस्थापन कामाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असावा. | 2 |
| 2 | सहाय्यक कक्ष अधिकारी किंवा तत्सम पदावरुन किंवा वरीष्ठ पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी | 1. उमेदवार शासकीय / निमशासकीय सेवेतून या पदावरुन किंवा तत्सम पदावरुन किंवा वरीष्ठ पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.<br>2. उमेदवारास मंत्रालयीन स्तरावरील कामाचा अनुभव असावा.<br>3. आस्थापना विषयक कामाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असावा. | 1 |

अटी व शर्ती:

1. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकिर्ण 2715/प्र.क्र.100/13/, दि. 17.12.2016 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.
2. उपरोक्त पद हे शासन सेवेतील नियमित पद नाही.
3. या पदावरील भरती निव्वळ तातुपरत्या स्वरुपातील व सुरवातीला 1 वर्षाच्या कालावधीसाठी मर्यादीत राहील.
4. सदर पद करार पध्दतीने भरण्यात येईल. उमेदवारास कोणत्याही प्रकारच्या स्थायी पदासाठी दावा करता येणार नाही अथवा हा अनुभव ग्राह्य असणार नाही.
5. या पदावर निवड झालेल्या उमेदवारास शासन सेवेत नियमित करण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.
6. उमेदवाराचे कामकाज कोणत्याही वेळी असमाधानकारक आढळल्यास निवासी आयुक्त यांच्या मान्यतेने एक महिन्याची पुर्व सुचना देऊन सेवा समाप्त करण्यात येतील.
7. सदर पदासाठी सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी अर्ज करण्यास पात्र असतील. त्यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. 17.12.2016 मधील तरतुदीनुसार परिश्रामिक देय राहील.
8. इतर अटी व शर्ती नियुक्तीबाबतच्या करारान्वये निश्चित करण्यात येतील.
9. कोणतेही कारण न देता अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे हा अधिकार निवासी आयुक्त कार्यालयाचा राहील.
10. उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीची सूचना वेगळ्याने कळविण्यात येईल.

नमूना अर्ज

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | उमेदवाराचे नाव | : | |
| 2 | जन्म दिनांक | : | |
| 3 | सेवानिवृत्तीचा विभाग/ कार्यालय | : | |
| 4 | सेवानिवृत्तीचा दिनांक | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | संपर्क : | | |
| | पत्ता: | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक: | ईमेल आयडी: |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | शैक्षणिक अर्हता | : | |

| | |
|---|---|
| 7 | कामाचा अनुभव : |

| अ. क्र. | कालावधी | पदाचे / कार्यालयाचे नाव | कामाचे ठिकाण | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

7. मी वय, शैक्षणिक अर्हता व कामाच्या अनुभवासंबंधी दस्तऐवज सोबत जोडले आहेत.

8. मी प्रमाणित करतो/करते की, माझ्याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित नाही. यापूर्वी मला कोणत्याही न्यायालयाकडून विकृत्तीकरण / फौजदारी खटल्याच्या अनुषंगाने शिक्षा झालेली नाही. मी याद्वारे प्रमाणित करतो / करते की सादर केलेली माहिती योग्य आहे.

दिनांक: अर्जदाराची स्वाक्षरी

ठिकाण: